**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ याचा जबाब**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांवः– श्रीनिवास सुरेश गवस
वय ४८ वर्षे, धंदाः–वकीली व्यवसाय,
रा. सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

**वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. कोलगांवकर यांचेमार्फत –**

१. मी सन २०११ पासून नोटरी म्हणून सिंधुदुर्ग जिल्हामध्ये काम पाहत असून माझे कार्यालय सावंतवाडी येथे आहे. मी नोटरी संदर्भात सर्व कागद व दस्त पक्षकारांचया सहया नोंदवून घेण्याचे काम करतो. शरद महादेव म्हात्रे व सुरेश नारायण राऊळ हे व्यक्ती माझ्या कार्यालयात दस्त नोंदणीकरीता आलेले होते. सदरचा दस्त मला दाखविलेस मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास नि.१७/१ कडील दस्त दाखविण्यात आला. साक्षीदार सांगतो की, तो तोच दस्त आहे. सदरची व्यक्ती दि.३१/०७/२०१८ रोजी कार्यालयात आलेले होते. सदर दस्तातील मजकूर त्यांच्या सांगण्याप्रमाणे आमच्या कार्यालयातील संगणकावर टाईप केलेला होता. त्यांनी सदरचा मजकूर वाचून पाहून व बरोबर असलेबाबत त्यांच्या सहया व डाव्या हाताचे अंगठे केलेले आहे. त्यांचे फोटो शेवटच्या पानावर आहे. तसेच साक्षीदार म्हणून अमित सुरेश राऊळ व रविंद्र शामराव पवार यांच्या सहया व अंगठे लावलेले आहेत. सदर दस्ताची आमच्या नोटरी रजिस्टरला नोंद केलेली आहे. सदरचा दस्ता माझ्या सहीने पूर्ण झालेला आहे. आज रोजी सदर शरद म्हात्रे न्यायालयात हजर आहेत. सदर दस्ताचा रजि.नं.५३१/२०१८ असा आहे. तो माझ्या कडील नोंद रजिस्टरप्रमाणे आहे. सदर रजिस्टरची प्रत मी सदर कामी हजर करु शकतो. सदर दस्तास **नि.२२** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.
प्रतिवादी यांना पुकारता गैरहजर.
अभिलेखावर कोणताही अर्ज नाही. सबब प्रतिवादीतर्फे उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.06.20 17:16:17 +0530

(श्रीमती आर.जी.कुंभार)
दि. २०/०६/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.